## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

### गुरुवार दि.२७ /१०/ २००४ रोजी झालेल्या १०२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची **१०२** वी बैठक बुधवार दि.२७/१०/२००४ रोजी दुपारी ३.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर | सभापती |
| २. | श्री.सुरेश कारंडे | मुख्य अधिकारी |
| ३. | मा.श्री.सचिन मा.सावंत | सदस्य |
| ४. | मा.श्री.विश्वास मोकाशी | सदस्य |
| ५. | मा.श्री.संजय शिर्के, | सदस्य |
| ६. | मा. श्री गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ७. | मा. श्री. रघुनाथ थवई | सदस्य |
| ८. | मा. श्री उस्मान गणी कुरेशी (लालीभाई) | सदस्य |
| ९. | मा. श्री मोहन देसाई | सदस्य |
| १०. | मा.श्री.बाप्पा सावंत | सदस्य |
| ११. | मा. श्रीमती.छाया कल्याणी | सदस्या |
| १२. | मा.श्री. रमेश परब | सदस्य |
| १३. | मा. श्री अबुबकर मुसा बाटलीवाला | सदस्य |
| १४. | कर निर्धारक व संकलक, म.न.पा. यांचे प्रतिनीधी | निमंत्रक |
| १५. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनिधी. | निमंत्रक |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन मा. सभापती श्री. सचिनभाऊ अहिर हे विधानसभा निवडणुकीत विजयी होऊन आमदार झाल्याबद्दल, त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे सर्वांतर्फे अभिनंदन केले. तसेच मा.श्री.सचिन मा.सावंत यांनीही मा. सभापती व आमदार श्री. सचिनभाऊ अहिर यांना सर्वांतर्फे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व ते लवकरच मंत्री पदाची शपथ घेतील अशी सदिच्छा व्यक्त केली.

तदनंतर मा. सभापती यांनी दिलेल्या सूचनेनुसार सचिव हयांनी बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

……………………………ooXXoo……………………………

बाब क्रमांक : १०२ / १

विषय- दि. १७.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या मंडळाच्या
१०१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

---

सदर कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ११३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर कार्यवृत्तांताच्या अनुषंगाने सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, पृ.क्र.४९ वरील ठराव क्रमांक १०१/८४५ मध्ये खालील बाब समाविष्ट करणे आवश्यक आहे.

" चिंचपोकळी सार्वजनिक मंडळास प्रोग्रेसिव्ह बिल्डिंग हया इमारतीतील रिक्त अनिवासी गाळा क्र.१ विशेष बाब म्हणून योग्य ती किंमत आकारुन देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली."

वरील सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात आला.

oo×o×oo

**उत्तर परिमंडळ**

बाब क्रमांक : १०२.२ (अ)

विषय- उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या
धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामास प्रशासकीय
मंजूरी देणेबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.११५ ते ११७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, दरवर्षीप्रमाणे दि. १.११.२००४ ते ३१.१०.२००५ हया कालावधीकरिता उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामासासाठी रु.१२.८० लक्ष अंदाजे खर्च अपेक्षित असून हयास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या धोकादायक भागांस टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

×o×o

**ठराव क्रमांक : १०२/८४७**

**उत्तर परिमंडळातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या धोकादायक भागास टेकू लावण्याच्या कामाच्या रु.१२.८० लक्ष (अंदाजे) खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

------------------------------------ooxoxoo------------------------------------

बाब क्रमांक : १०२ / २ (ब)

विषय- उत्तर परिमंडळातील सन २००४ च्या पावसाळापूर्व सर्वेक्षणात धोकादायक घोषित केलेल्या इमारतींची सद्यस्थिती.

---

सदर माहिती माहितीसाठी पृ.क्र.११९ ते १२१ वर सादर करण्यात आली आहे.

सदर माहितीची नोंद घेण्यात आली.

------------------------------------ooxoxoo------------------------------------

बाब क्रमांक : १०२.२ (क)

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.१२३ ते २२१ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (उत्तर) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील ई. विभागातील १७, फग-द. विभागातील ५, फग-उ. विभागातील ८ अशा एकूण ३० इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. ह्याशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात उत्तर परिमंडळातील एकूण ०४ इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रे प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर मंडळातील एकूण ३४ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/ सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १०२ / ८४८

**उत्तर परिमंडळातील एकूण ३४ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मूळ / सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------------xxxx---------------

बाब क्रमांक : १०२.३ (अ)

विषय- मुंबई शहर बेटावरील ज्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची अंदाजपत्रके दुरुस्ती दर रु. १०००/- प्रति चौ.मी.पेक्षा जादा रक्कमेने मंजूर झालेली आहेत अशा कामांना प्रचलित प्रमाणित मर्यादा रु. १२०० प्रति चो.मी. लागू करण्याबाबत.

-------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.२२३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, शासनाने दुरुस्ती खर्चाची प्रमाणित मर्यादा रु. १००० प्रति चो.मी. वरुन रु. १२०० प्रति चो.मी.दि. २.९.२००४ पासून अंमलात आणली आहे. त्यामुळे ज्या इमारतींच्या दुरुस्तीची कामे दि. २९.३.२००४ रोजी सुरु होती अशा सर्व दुरुस्ती कामांना रु. १२०० प्रति चो.मी. मर्यादा लागू करण्यासाठी मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १०२ / ८४९

**ज्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची कामे दि. २९.३.२००४ रोजी सुरु होती अशा सर्व दुरुस्ती कामांना रु. १२००/- प्रति चौ.मी.प्रमाणे प्रस्तावित मर्यादा लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

---------------///---------------

बाब क्रमांक : १०२.३(ब) व (क)

विषय- दक्षिण परिमंडळातील डी-२ व सी१-२ विभागातील धोकादायक व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

....................

सदर प्रस्ताव पृ.क्र.२२५ ते २२७ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अनुक्रमे डी-२ व सी १-२ विभागातील धोकादायक व मोडकळीस आलेल्या इमारतींना टेकू लावण्याच्या कामासाठी अनुक्रमे रु.२,३५,४०४/- व रु. ३,७७,०२१/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : १०२/८५०**

**दक्षिण परिमंडळातील डी-२ व सी १-२ विभागातील धोकादायक व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींना टेकू लावण्याच्या कामाच्या अनुक्रमे रु.२,३५,४०४/- व रु. ३,७७,०२१/- रक्कमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

o----------x----------o

<u>बाब क्रमांक : १०२.(ड)</u>

विषय- इ.क्र.३३डी, जे.एस.एस.रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

सदर बाब पृ.क्र.२२९ ते २३१ वर सादर करण्यात आली आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामाचे सुधारित अंदाजपत्रकास रक्कम रु. ५,१२,२७९/- (रु.१४४०.६० प्रति चौ.मी. दराने ) प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष झालेल्या कामानुसार दुरुस्तीचा खर्च हा रु. ५,९२,९५७/- (रु.१६६७.४८ प्रति चौ.मी.) आहे जो सुधारित प्रशासकीय मंजरीपेक्षा रु.८०,६७८/- (१५.७४ %) जास्त आहे. रहिवाशांनी रु. (रु.१०००/- प्रति चौ.मी.वरील जादा रक्कम रु.२,३७,३५७/- पैकी रु.२,२४,६७९/- मंडळाकडे जमा केलेले आहेत.त्यामुळे ठेकेदारास रु.३,५५,६००+रु.२,२४,६७९ = रु.५,८०,२७९/- पर्यंत रक्कमेचे देयक पारित करण्यास हरकत नसावी. सुधारित प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक असलेली रक्कम रु. ६८,०००/- असून त्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : १०२/८५१**

**इ.क्र.३३डी, जे.एस.एस.रोड, मुंबई या इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या दुरुस्तीसाठी झालेल्या रु.५,८०,२७९/- (रु.१६६७.४८ प्रति चौ.मी.) खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----xoxox-----

बाब क्रमांक : १०२.३(इ)

विषय- इ.क्र.१-१४, पलटन रोड या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीबाबत.

---

सदर बाब पृ.क्र. २३३ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता/अ. विभाग यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पहिल्या टप्प्याच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करताना इमारतीचे क्षेत्रफळ ४८७२.१५ चौ.मी.गृहीत धरण्यात आले होते. परंतु हया इमारतीच्या दुरुस्ती कामाचे सु-सुधारित अंदाजपत्रक तयार करताना असे आढळून आले की, हया इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ ६४४२.५९ प्रति चौ.मी.आहे. मुळ इमारतीशेजारील ॲनेक्स इमारतीचे क्षेत्रफळ पूर्वी विचारात घेण्यात आले नव्हते. त्यामुळे सुधारित क्षेत्रफळास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक : १०२/८५२**

**इ.क्र.१-१४, पलटन रोड, मुंबई या इमारतीच्या ६४४२.५९ चौ.मी. सुधारित बांधकाम क्षेत्रफळास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

-----xoxox-----

बाब क्रमांक : १०२.३(ई)

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशाकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

---

सदर प्रस्ताव पृ.क्र.२३५ ते ३२९ वर सादर करण्यात आले आहेत.

सदर प्रस्तावांच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील अ. विभागातील ५, ब. विभागातील ७, सी १-२ विभागातील १२, सी ३-४ विभागातील १, डी-१ विभागातील ६ व डी-२ विभागातील ४ अशा एकूण ३५ उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांची मूळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत याशिवाय मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात दक्षिण परिमंडळातील एकूण ६ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीची अंदाजपत्रके प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आली आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे सर्वानुमते ठरले.

------------------------------xoxox-------------------

**ठराव क्रमांक : १०२/८५३**

**दक्षिण परिमंडळातील एकूण ३७ इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब प्रमाणे प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.**

-----------ooo-----------

<u>बाब क्रमांक : १०२.४</u>

विषय- २८२-२८६ आयेशा बिल्डिंग, डॉ. कावसजी होरमासजी स्ट्रीट,धोबी तलाव,मरिन लाईन्स (पू), मुंबई-०२ येथील भूखंड त्यावरील इमारतीसह नियोजित आयेशा सह.गृह.नि.संस्थेकरिता कलम १०३ (ब) अन्वये भू-संपादन करण्याचे प्रस्तावास शासनाकडे सादर करण्यासाठी मंडळाची मंजूरी मिळणेबाबत.

------------------------------

सदर प्रस्ताव पृ.क्र.३३१ ते ३३७ वर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उप अभियंता, सहकार संस्था कक्ष हयांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रस्तावामध्ये ७० टक्के रहिवाशांनी संमती दिली असून सदर प्रस्ताव शासनाकडे भूसंपादनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास मंडळाची मंजूरी आवश्यक आहे. का.अ./सी ३-४ विभाग हयांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, सदर इमारत तळ + ३ मजल्यांची असून ही इमारत धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट होती. इमारतीचा काही धोकादायक भाग पाडला असून उर्वरित भागास टेकू लावले आहेत. रहिवाशांना जागा खाली करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. तळ मजल्यावरील रहिवाशांनी जागा खाली केलेल्या नसून ही इमारत दुरुस्त करण्याचा प्रस्ताव वास्तुशास्त्रज्ञ श्री. ए.जी.सोळंकी यांच्यामार्फत सादर केला आहे. वास्तुशास्त्रज्ञ श्री. ए.जी.सोळंकी हे

मंडळाच्या यादीवर नसल्याने मंडळाच्या यादीवरील वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करुन प्रस्ताव नव्याने सादर करण्याबाबत रहिवाशांना कळविले आहे. अशा परिस्थितीत हया इमारतीच्या भूसंपादनाच्या प्रस्तावाबाबत मंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा.

मा. सभापती यांनी विचारल्यानुसार उप अभियंता, सह.सं.कक्ष यांनी असे प्रतिपादन केले की, ही अतिशय लहान इमारत असून धोकादायक आहे. तिची पुनर्बांधणी होणे शक्य नाही. त्यामुळे हया इमारतीची दुरुस्ती करणे क्रमप्राप्त आहे. हया इमारतीतील रहिवाशांनी स्वखर्चाने इमारत दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, रहिवाशी जर स्वखर्चाने इमारतीची दुरुस्ती करु इच्छितात तर मग भूसंपादनाच्या प्रस्तावाची आवश्यकता भासत नाही. रहिवाशांनी दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र घेऊन इमारतीची दुरुस्ती करावी. कलम ३३ बी नुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु केल्यास इमारत दुरुस्त करण्यात अडचणी येतील. मंडळाच्या तसेच आमदार निधीच्या कामातंर्गत इमारतीची दुरुस्ती करता येणार नाही. हयामुळे रहिवाशांना हयाबाबत योग्यप्रकारे मार्गदर्शन करावे. कलम १०३ (ब) अंतर्गत प्रस्ताव मंजूर केल्यानंतर इमारतीची दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत होऊ शकत नाही. हया परिस्थितीत रहिवाशांना योग्य मार्गदर्शन करुन हा प्रस्ताव मंडळापुढे पुढील बैठकीत फेर सादर करावा असे मा. सभापती यांनी सुचविले व हया सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

----------o0o----------

<u>बाब क्रमांक : १०२.५ (अ)</u>

विषय- इ.क्र.५५-५७ व ६१-६९, कामाठीपूरा, ५वी गल्ली, ई.विभाग
भूखंड पाहणी क्र. ८०९ व ८११, भायखळा विभाग येथील
संयुक्त पुनर्बांधणी योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

.........................

सदर प्रस्ताव पृ.क्र.३३९ ते ३५७ वर सादर करण्यात आला आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, इ.क्र.५५-५७ ही कलम ८८ (३)(अ) नुसार व इ.क्र.६१-६९ ही कलम ८८ (३) (ब) नुसार घोषित करण्याचे प्रस्तावित असून हया दोन्ही इमारतींची संयुक्त पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली आहे. म.न.पा. ने मंजूर केलेल्या नकाशांनुसार जून्या ४७ निवासी + ९ अनिवासी = ५६ गाळयांऐवजी नवीन इमारतीत ३५ निवासी + ९ अनिवासी = ४४ गाळे बांधण्याचे प्रस्तावित आहे. हया पुनर्बांधणी योजनेस रु. ९९,७३,३४१/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १०२/८५४

**इ.क्र.६१-६९, कामाठीपूरा, ५वी गल्ली हया इमारतीस म्हाड अधिनियम ही कलम ८८ (३) (ब) नुसार प्रमाणपत्र जारी करण्यास तसेच इ.क्र.५५-५७ व इ.क्र.६१-६९, कामाठीपूरा, ५वी गल्ली हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. ९८,७३,३४१/- खर्चास प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते देण्यात आली.**

-----------------------------xoxo-----------------------------

बाब क्रमांक : १०२.५ (ब)

विषय- इ.क्र.१-३-५-७-९-११, कामाठीपूरा, ४थी गल्ली, ई.विभाग
भूखंड पाहणी क्र. ८६१, ८६२, ८६३, ८६४, ८६५ व ८६६,
भायखळा विभाग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेस
सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

.........................

सदर बाब पृ.क्र.३५९ ते ३७५ वर सादर करण्यात आली आहे

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, विषयांकित इमारतींची पुनर्बांधणी योजना मंडळाने हाती घेतली असून या योजनेच्या रु. ३४,८०,४५६/- रक्कमेच्या खर्चास सन १९९४ मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती.

प्रचलित पध्दतीनुसार सुधारित स्पेसिफिकेशनचा अंतर्भाव करुन अंदाजपत्रक सुधारित करण्यात आले आहे. सुधारित अंदाजपत्रकानुसार हया योजनेसाठी रु. ९७,८३,३१२/- खर्च अपेक्षित असून त्यास मंडळाची सुधारित प्रशासकीय मंजूरी आवश्यक आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : १०२/८५५

**इ.क्र.१-३-५-७-९-११, कामाठीपूरा, ४थी गल्ली, भायखळा विभाग हया इमारतींच्या संयुक्त पुनर्बांधणी योजनेच्या रु. ९७,८३,३१२/- रक्कमेच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्राप्त करण्यात आली.**

-----------------------------xoxo-----------------------------

१८

**बाब क्रमांक : १०२.६**

## मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयात सादर करावयाचे प्रस्ताव.

१) विषय- भूकर पाहणी क्र.१२१, माझगांव विभाग, इ.क्र.ए,बी,सी.डी, इ व २१, नेस्बीस मार्ग, ई.विभाग, माझगाव, मुंबई-१० येथील हाजी कासम चाळ म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाबाबत.

-----------------------------

सदर प्रस्ताव मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयात पटलावर सादर करण्यात आला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता यांनी असे प्रतिपादन केले की, हया मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मंडळाने दि. २६.६.२००१ रोजी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. हया मालमत्तेवर एकूण ३७ पात्र झोपडपटटया असून हया झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी लागणारा अधिकचा चटईक्षेत्र निर्देशांक शासनाने द्यावा हयासाठी सविस्तर प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दि.२१.८.२००४ रोजीच्या पत्रान्वये असे आदेश दिले आहेत की, हया पात्र ३७ झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी लागणारा अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक देता येणे शक्य नसल्याने मंडळाने मंडळाला उपलब्ध होणा-या अतिरिक्त क्षेत्रफळातून झोपडीधारकांचे पुनर्वसन करावे व जर सर्व झोपडीधारकांचे पुनर्वसन हया योजनेत करता येणे शक्य नसेल तर मंडळाने मंडळाला अन्य योजनेमधून उपलब्ध होणा-या अतिरिक्त गाळयांमध्ये हया झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय मंडळाने घ्यावा. हयाबाबत असा प्रस्ताव आहे की, हया पुनर्विकास योजनेमध्ये ना हरकत प्रमाणपत्रधारकास एकूण ४५४९.४६ चौ.मी. अतिरिक्त क्षेत्रफळ खुल्या बाजारातील विक्रीसाठी उपलब्ध होणार आहे. पात्र ३७ झोपडीधारकांच्या पुनर्वसनासाठी लागणारे बांधकाम क्षेत्रफळ ९२३.५५ चौ.मी. आहे. त्यामुळे विकासकाने पात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन त्याला उपलब्ध होणा-या अतिरिक्त क्षेत्रफळातून केले तरी ही योजना आर्थिकदृष्टया सक्षम होणार आहे. हया परिस्थितीत हया झोपडीधारकांचे पुनर्वसन ना हरकत प्रमाणपत्रधारकाने त्याला उपलब्ध होणा-या अतिरिक्त क्षेत्रफळातून करावे असा प्रस्ताव असून त्यास मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांनी मान्यता दिली असून त्यानुसार शासनास फेर प्रस्ताव सादर करण्याचा प्रस्ताव आहे.

मा. सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, शासनाच्या आदेशांनुसार पात्र ३७ झोपडीधारकांचे पुनर्वसन मंडळाने बृहतसूचीवरुन करण्याबाबत मंडळाला निर्णय घ्यावयाचा आहे. मात्र बृहतसूचीवरुन गाळयांचे वाटप करण्याचे अधिकार शासनाने मंडळाला दिलेले नाहीत. अशा परिस्थितीत हयाबाबत मंडळाने निर्णय घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. बृहतसूचीवरुन

गाळयांचे वाटप करण्याचे अधिकार जर शासन मंडळाला देणार असेल तर हयाबाबत विचार होऊ शकतो.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कायद्यातील तरतुदींनुसार ना हरकत प्रमाणपत्रधारकानेच हया पात्र ३७ झोपडीधारकांचे पुनर्वसन त्याला उपलब्ध होणा-या अतिरिक्त क्षेत्रफळातून करणे बंधनकारक आहे. मंडळाच्या बृहतसूचीवरुन हया झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उदभ्वत नाही. हया पात्र झोपडीधारकांच्या पुनर्वसनामुळे जर ना हरकत प्रमाणपत्रधारकावर आर्थिक बोजा पडणार असेल तर नगर विकास विभागाने त्यासाठी अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक द्यावा. हयाप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करुन शासन स्तरावरच हयाबाबत निर्णय घेण्यात यावा असे शासनास कळवावे. हयास सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

----------xxooxxoo----------

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या दि. ७.७.२००४ रोजीच्या बैठकीमध्ये भू.पा.क.२०९, परेल शिवडी विभाग, ठोकरशी जिवराज रोड, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यापूर्वी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांची परवानगी घेण्याबाबत ठरले होते व त्यानुसार अर्जदारास कळविण्यात आले होते. हयाबाबत अर्जदाराने असे कळविले आहे की, हया मालमत्तेमध्ये अंदाजे ५०० रहिवाशी असल्याने ही योजना लवकर सुरु करणे आवश्यक आहे. मात्र काम सुर करण्यापूर्वी ते धर्मादाय आयुक्त, मुंबई यांची परवानगी सादर करतील. त्यामुळे त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यात यावे. यासंदर्भात मुख्य अधिकारी, दु.व पु. यांनीदेखील सदर पुनर्विकासाच्या प्रस्तावांतर्गत सुमारे ५०० रहिवाशांचे पुनर्वसन होणार असल्याने व प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्याअगोदर धर्मादाय आयुक्त यांची मंजूरी प्राप्त करुन ते मंडळास सादर करण्याच्या अटीवर ना.ह.प्र.पत्र प्रदान करणे शक्य आहे, असे प्रतिपादन केले. हया परिस्थितीत हया मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी काम सुर करण्यापूर्वी धर्मादाय आयुक्त, मुंबई यांची परवानगी घेण्याच्या अटीवर ना.ह.प्र.पत्र दि. २०.१०.२००४ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेले आहे. सदर बाब मंडळापुढे माहितीसाठी सादर करण्यात आली व त्यास सर्वांनी सहमती दर्शविली.

----------xxooxxoo----------

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, मा. उच्च न्यायालयामध्ये विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (७) अंतर्गत पुनर्विकास प्रस्तावांबाबत जनहित याचिका दाखल केलेली असून हयाबाबत मा. उच्च न्यायालयाने काल दि. २६.१०.२००४ रोजी ओदश दिले आहेत. त्यामुळे

हयाबाबतची नेमकी वस्तुस्थिती काय आहे व मा. उच्च न्यायालयाने कोणते आदेश दिले आहेत ? अशी विचारणा मा. सभापती यांनी केली.

तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता यांनी असे प्रतिपादन केले की, श्री. जे.बी.डिसोझा यांनी महाराष्ट्र शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्याबाबत काल दि. २६.१०.२००४ रोजी मा. उच्च न्यायालयात सुनावणी होऊन मा. उच्च न्यायालयाने विकास नियंत्रण नियमावली क्र. ३३ (७) अंतर्गत पुनर्विकास प्रकरणांमध्ये अंतरिम स्थगिती आदेश दिले असून ज्या प्रकरणांमध्ये च.क्षे.नि. हा २.५० पेक्षा अधिक द्यावा लागणार असेल तर त्याबाबत तपासणी करण्यासाठी त्रिसदस्य समिती नेमण्याचे आदेश दिले आहेत तसेच पुनर्वसनासाठी लागणारा च.क्षे.नि.+ ५० टक्के प्रोत्साहनात्मक च.क्षे.नि. हा जर जास्त होत असेल तर अशा प्रत्येक प्रकरणाबाबत मा. आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांनी जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन निर्णय घ्यावा. मा. उच्च न्यायालयाचे लेखी आदेश अद्याप प्राप्त झालेले नाहीत. मात्र काल झालेल्या सुनावणीमध्ये वरीलप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयाबाबत वृत्तपत्रात छापून आलेल्या बातम्यांनुसार रहिवाशांच्या पुनर्वसनासाठी लागणारा च.क्षे.नि. + ५० टक्के प्रोत्साहनात्मक च.क्षे.नि. देण्यास मा. उच्च न्यायालयाने मनाई केली आहे तसेच ज्या प्रकरणात २.५० च.क्षे.नि. देय आहे अशा सर्व प्रकरणांची छाननी समिती नेमून करावयाची आहे. हया समितीमध्ये शासन, म.न.पा. व मंडळाच्या अधिका-यांचा समावेश केला जाण्याची शक्यता आहे. मात्र हया समितीमध्ये नेमकी कोणाची नियुक्ती केली जाईल हे अद्याप निश्चित झालेले नाही.

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, वर्तमानपत्रातील बातमीनुसार पुनर्विकासाची परवानगी ही फक्त धोकादायक इमारतींना देण्यात यावी असे नमूद करण्यात आले आहे. निवासी कार्यकारी अभियंता यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार सुस्थितीतील इमारतींना पुनर्विकासाची परवानगी देण्यात येऊ नये. ज्या इमारतीं धोकादायक आहेत किंवा मोडकळीस आलेल्या अहेत अशाच इमारतींच्या पुनर्विकासासाठी मंजूरी देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. बाप्पा सावंत यांनी तदनुषंगाने अशी विचारणा केली की, ज्या इमारती सन १९४० नंतर बांधलेल्या आहेत परंतु त्या मोडकळीस आलेल्या आहेत अशा इमारतींबाबत काय कारवाई करावी लागणार आहे ? निवासी कार्यकारी अभियंता यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, २.५ च.क्षे.नि.ची सवलत ही सन १९४० (१०४०) पूर्वी बांधलेल्या 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी देय आहे. मा. उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका ही सन १९४० पूर्वी बांधण्यात आलेल्या 'अ' वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या अनुषंगाने आहे.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मा. उच्च न्यायालयाने अंतरिम मनाई आदेश दिले असल्याने आपणांस हया आदेशांचे पालन करावे लागेल. हयाबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण, विधी सल्लागार/प्रा, मुख्य अधिकारी,दुवपु यांनी विचारविनिमय करुन आपली भूमिका ठरवून त्यानुसार पुढील कार्यवाही त्वरित करावी. मा. उच्च न्यायालयाचे आदेश आपणांस मान्य नाहीत . उपकरप्राप्त इमारतीतील ७० टक्के रहिवाशांच्या संमतीपत्रासह पुनर्विकासाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यास संबंधित इमारत जरी सुस्थितीत असली तरी पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याची तरतुद कायद्यान्वये आहे. ही वस्तुस्थिती म.न.पा.ने मान्य केली असून ती प्राधिकरणास/मंडळासही मान्य आहे. त्यामुळे हयाबाबत मा. उच्च न्यायालयात अपिल करावे किंवा कसे हयाबाबत अधिका-यांनी निर्णय घेऊन पुढील कार्यवाही तात्काळ करावी.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाची अंतिम सुनावणी मा. उच्च न्यायालयात दि. १३.१२.२००४ रोजी होणार आहे. हया सुनावणीपूर्वी मा. उच्च न्यायालयात प्राधिकरणाने/मंडळाने घ्यावयाच्या भूमिकेबाबत विचारविनिमय करुन पुढील निर्णय घेण्यात येईल. मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम मनाई आदेशांमुळे आजच्या बैठकीत पुनर्विकासाचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले नाहीत.

मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की,मा. उच्च न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर जर मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांचयाशी तदनुषंगाने चर्चा करुन आवश्यक भासल्यास हया प्रकरणाबाबत जोड बैठक आयोजित करण्यात यावी.

------------------------xxooxxoo-----------------

मा. सभापती यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, आपण सर्वांनी मिळून मुंबई शहरामध्ये आपल्या मंडळाने उत्कृष्ट काम केल्याने पुन्हा आघाडी सरकार सत्तेवर येण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे मा. सभापती यांनी त्यांच्या आघाडी सरकारतर्फे व पक्षातर्फे सर्व अधिकारी/कर्मचारीवर्गाचे आभार मानले. ज्याप्रमाणे मंडळाच्या अधिकारी/कर्मचारीवर्गाने यापूर्वी सहकार्य केले त्याचप्रगमाणे नवीन सरकारलाही मंडळाच्या सहकार्याची अपेक्षा आहे. आघाडीचे सरकार स्थापनेच्या वाटचालीवर असल्याने आजच सिध्दीविनायक मंदिरात जाऊन आशिर्वाद घेतले आहेत व त्याच्या तिर्थप्रसादाचा सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती मा. सभापती यांनी केली. निवडणुकीनंतर मंडळाची आजची ही पहिलीच बैठक आहे. त्यामुळे मा. सभापती यांनी सर्वांना शुभेच्छा देऊन अशी आशा व्यक्त केली की, येणा-या भविष्य काळामध्ये नवीन धोरणात्मक निर्णय घ्यावे लागणार आहेत. आपण रहिवाशांना आता २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्राचे गाळे देण्याचा निर्णय सन १९९५ मध्ये झाला असून त्याला आता १० वर्षे होत आली आहेत. दिवसेंदिवस कुटुंबातील व्यक्तींची संख्या वाढीस लागलेली आहे. त्यामुळे यापुढे सर्व

रहिवाशांना किमान २२५.०० चौ.फू. ऐवजी २५०.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाच्या सदनिका देण्याबाबतचा निर्णय नजिकच्या काळात आपल्या मंडळामार्फत घ्यावा लागणार आहे व तसा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याच्या सूचना मा. सभापती यांनी दिल्या. शेवटी मा. सभापती यांनी सर्वांच्या सहकार्याबद्दल पुन्हा आभार मानले. मा. सभापतीच्या हया प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांनी संमती दर्शविली व खालीलप्रमाणे ठराव संमत केला.

**ठराव क्रमांक : १०२/८५६**

**मुं.इ.दु.व पु.मंडळामार्फत पुनर्रचित केल्या जाणा-या इमारतींमध्ये २२५.०० चौ.फू. ऐवजी २५०.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाच्या सदनिका रहिवाशांसाठी बांधण्याचा सविस्तर प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी सादर करण्यास सर्वानुमते मंजरी देण्यात आली.**

----------xxooxxoo----------

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर असे प्रतिपादन केले की, २२५ चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळयांच्या भाडेकरु हक्क बदलाबाबतचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून अशा गाळयांच्या भाडेकरु हक्क बदलास परवानगी देण्यास हरकत नसावी असे वाटते. तदनुषंगाने मा. सभापती यांनी अशा गाळयांच्या भाडेकरु हक्क बदलास मंजूरी देऊन त्याबाबतची कार्यवाही एक आठवडयात करण्याचे आदेश दिले व सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव क्रमांक : १०२/८५७**

**मुं.इ.दु.व पु.मंडळामार्फत पुनर्रचित केलेल्या इमारतींतील २२५.०० चौ.फू. चटईक्षेत्रफळाच्या गाळयांच्या भाडेकरु हक्क बदलास मंजूरी देण्यास व त्याबाबतची कार्यवाही त्वरित करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

----------xxooxxoo----------

मा.सभापती यांनी तदनंतर असे सुचविले की, पुनर्रचित इमारतींमध्ये ज्या खिडक्या बसविल्या जातात त्यांचा आकार लहान असल्याने गाळयांमध्ये अपुरा प्रकाश पडतो. त्यामुळे खिडक्यांच्या आकारामध्ये वाढ केल्यास पुरेसा प्रकाश गाळयांमध्ये उपलब्ध होईल. व हया खिडक्यांना बाहेरुन लोखंडी जाळयाही बसविण्यात याव्यात. तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन

केले की, आता आपण हॉलमध्ये ६ फूट × ४ फूट आकाराची व किचनमध्ये ३.५ फूट ×४ फूट आकाराची खिडकी, लोखंडी जाळीसह बसविण्यास सुरुवात केलेली आहे. ज्यामुळे गाळयांमध्ये पुरेसा प्रकाश उपलब्ध होईल.

------------------------xxooxxoo-----------------

मा.सभापती यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, आपण सद्यः इरॉस किंवा ओटीस कंपनीच्या लिफ्टस् बसविण्याबाबत काय कारवाई करण्यात येत आहे ? उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, आपण पुनर्रचित इमारतींमध्ये सद्यः इरॉस किंवा ईस्कॉन कंपनीच्या लिफ्टस् बसवित आहोत. तसेच उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे सुचविले की, पुनर्रचित गाळयांमध्ये ऑईल बाँड डिस्टेम्पर रंग वापरणे आवश्यक आहे ज्यामुळे गाळयाचे स्वरुप अधिक चांगले दिसेल. तसेच शौचकूपाच्या भागामध्ये ॲल्युमिनियमचे व्हेंटीलेटर्स लावणे आवश्यक आहे. हयाबाबत मुख्य अभियंता-२ / प्रा. यांच्याशी चर्चा केली असून त्यांनी हयास सहमती दर्शविली आहे. मा. सभापती व सर्व सन्मा. सदस्यांनी हयास संमती दर्शवून पुनर्रचित गाळयांना यापुढे ऑईल बाँड डिस्टेम्पर रंग लावण्याचे व शौचालयाच्या भागामध्ये ॲल्युमिनियमचे व्हेटिलेटर्स लावण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक : १०२/८५८**

**मुं.इ.दु.व पु.मंडळामार्फत पुनर्रचित केल्या जाणा-या गाळयांना ऑईल बाँड डिस्टेम्पर रंग लावण्यास व शौचालयाच्या भागात ॲल्युमिनियम व्हेंटिलेटर बसविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.**

------------------------xxooxxoo-----------------

मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, आशिर्वाद क्रिडा मंडळाच्या बांधकामाबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे ? का.अ./ पु.वि.३ यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करण्यात आलेली आहे व तदनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, भालेराव मार्गावरील पुनर्रचित इमारतीबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीच्या पुनर्रचनेचे काम पूर्ण झाले असून गाळे वाटपाची कामही पूर्ण झालेले आहे. येत्या ४-५ महिन्यांत रहिवाशांना गाळयांचा प्रत्यक्ष ताबा मिळेल. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ज्या इमारतींच्या पुनर्रचनेची कामे पूर्ण झालेली आहे अशा इमारतींच्या उद्घाटनांचा कार्यक्रम त्वरित आयोजित करणे आवश्यक आहे. मा. सदस्य

श्री. परब यांच्या पुनर्रचित इमारतीमध्ये विजेची व पाण्याची सुविधा उपलब्ध झाली किंवा नाही अशी विचारणा मा. सभापती यांनी केली. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हया इमारतीला म.न.पा.कडून भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) प्राप्त करुन घेतले आहे.

तदनंतर मा. सदस्य श्री. रमेश परब यांनी असे प्रतिपादन केले की, राम भूवन या इमारतीतील एका अतिरिक्त रिक्त असलेल्या गाळयाची मागणी हया इमारतीतील रहिवाशी श्री. सिनकर ब-याच वर्षांपासून करीत आहेत. अशाप्रकारच्या रिक्त गाळयांचा प्रश्न ब-याच दिवसांपासून प्रलंबित आहे. लक्ष्मी सदन याही इमारतीतील रिक्त गाळयाची मागणी लेकावळे यांनी केली आहे. त्यामुळे अशा रिक्त गाळयांचा प्रश्न लवकरात लवकर सोडविणे आवश्यक आहे. मा. सभापाती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, अतिरिक्त गाळे व अतिरिक्त क्षेत्रफळाबाबतचा निर्णय मंडळाच्या मागील बैठकीतच घेण्यात आला आहे. त्यानुसार अतिरिक्त गाळयापोटी रु. १३००/- किंवा रु. १५००/- प्रति चौ.फूटाचा दर निश्चित करण्यात आला आहे. मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, निवासी गाळयासाठी रु. १५००/- व अनिवासी गाळयापोटी रु. ३०००/- प्रति चौ.फू. दर निश्चित करण्यात आला आहे. मा. सभापाती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, पंतप्रधान अनुदान प्रकल्पांतर्गत बांधलेल्या इमारतीतील गाळयांसाठी त्या त्या वेळचा दर आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु आवश्यक वाटल्यास हयाबाबतची सविस्तर माहिती तयार करुन मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांची त्यास मंजूरी घेण्याचे आदेश मा. सभापती यांनी दिलें.

---------------------------------xoxoxo---------------------------------

मा. सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, म.न.पा.कडे सद्यः उपकराची किती थकबाकी आहे ? मुख्य लेखाधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, म.न.पा.कडून अद्याप रु. १० कोटी येणे बाकी आहेत. उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मुंबई शहराच्या विकासासाठी/पुनर्रचनेसाठी रु. २५० कोटी देण्यास हरकत नसावी अशा स्वरुपाचे पत्र प्राप्त झालेले आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने हयाबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आदेश दिले. मा. खासदार श्री. देवरा यांनी यापूर्वीच मुंबईच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त करुन घेण्याबाबत आश्वासन दिलेले आहे. त्यामुळे हयाबाबतचा सविस्तर प्रस्ताव राज्य सरकारला सादर करुन त्याची प्रत त्यांना व सन्मा. सदस्य सर्वश्री.गजेंद्र लष्करी व विश्वास मोकाशी यांना देण्यात यावी जेणेकरुन मा. खासदार श्री. देवरा यांच्याबरोबर त्याबाबत चर्चा करुन पाठपुरावा करणे शक्य होईल.

---------------------------------xoxoxo---------------------------------

मा. सभापती यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, संक्रमण शिबीरात सद्यः किती गाळे रिक्त आहेत तसेच घुसखोरांना संक्रमण शिबीरातून हटविले आहे किंवा नाही ? हयाबाबत मा. आमदार श्री. बाबा सिध्दीकी एकसारखी विचारणा करीत आहेत. बांद्रा संक्रमण शिबीरात गाळे रिक्त नसल्याचे अधिका-यांकडून सांगितले जाते. मात्र मा. आमदार श्री. बाबा सिध्दीकी यांच्या म्हणण्यानुसार बांद्रा संक्रमण शिबीरात ६० गाळे रिक्त असून ते घुसखोरांना रु. ३०००/- ते रु. ४०००/- प्रतिमाह दराने भाडे तत्वावर देण्यात आलेले आहेत. त्यामुळे हया घुसेखोरांना त्वरित संक्रमण शिबीरातून हटवून ते गाळे मागणीनुसार संबंधित रहिवाशांना त्वरित वाटप करावेत जेणेकरुन त्याठिकाणी पुन्हा घुसखोरी होणार नाही असे आदेश मा. सभापती यांनी दिले.

मुख्य अधिकारी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, हयासाठी अतिरिक्त कर्मचारीवर्गाची मागणी करण्यात आलेली आहे. सायन संक्रमण शिबीरातील एकलव्य शाळेचे ४० गाळे /वर्ग धोकादायक झाल्याने हे गाळे खाली करुन त्यांना अन्यत्रठिकाणी गाळे उपलब्ध करुन दिले आहेत.

---------------------------------xoxoxo---------------------------------

मा. सदस्य श्री.मोहन देसाई यांनी तदनंतर अशी विचारणा केली की, पानसरे शिंदे चाळीबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? तदनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, हयाबाबत मध्यंतरी एक बैठक झाली होती. हया बैठकीस मा. प्रधान सचिव श्री. रामानंद तिवारी, नगरविकास विभाग हे उपस्थित होते. हया बैठकीत रेल्वे लाईनला लागून असलेल्या इमारतींबाबत चर्चा झाली होती. हया चाळीच्या जागेवर असलेल्या आरक्षणाचे रिलोकेशन करुन त्यास नगरविकास विभागाची मंजूरी आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सविस्तर प्रस्ताव तयार करुन तो वरिष्ठ अधिका-यांकडे शासनास सादर करण्यासाठी पाठविला आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे आदेश दिले की, हयाबाबत पाठपुरावा करुन लवकरात लवकर मंजूरी घेऊन पुढील कार्यवाही करावी.

मा. सभापती यांनी तदनंतर क्रांती नगर योजनेबद्दल अशी विचारणा केली की, हया इमारतीच्या पुनर्विकासाची सद्यस्थिती काय आहे ? तदनुषंगाने निवासी कार्यकारी अभियंता यांनी असे प्रतिपादन केले की, ना हरकत प्रमाणपत्रधारकास ना हरकत प्रमाणपत्र रद्द का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, ही योजना गेल्या दोन वर्षांपासून रखडलेली आहे. ना हरकत प्रमाणपत्रधारक कोणतीची कार्यवाही करीत नाहीत. अशा परिस्थितीत ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात यावे असे मा. सभापती यांनी सुचविले. मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, कारणे दाखवा नोटीशीची मुदत संपली असल्याने ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. मा. सभापती यांनी तदनुषंगाने ना हरकत प्रमाणपत्र त्वरित रद्द करण्याचे आदेश देऊन असे प्रतिपादन

३५

केले की, अशीच परिस्थिती न्यू अंबालाल चाळीबाबतही असून ना हरकत प्रमाणपत्र त्वरित रद्द करणे आवश्यक आहे. ना हरकत प्रमाणपत्र रद्द केले असल्यास त्याची प्रत देण्याचे तसेच या चाळीची दुरुस्ती प्रचलित प्रमाणित मर्यादा रु. १२००/- प्रमाणे हाती घेऊन इमारत उत्तमरित्या दुरुस्त करण्याचे व दुरुस्तीसाठी चांगल्या ठेकेदाराची नेमणूक करण्याचे आदेश दिले.

मा. सदस्य श्री. विश्वास मोकाशी यांनी असे प्रतिपादन केले की, पूर्वी श्रीमती. वंदना खुल्लर हया मुख्य अधिकारी व श्री.चन्ने हे सहमुख्य अधिकारी असताना पुनर्रचित गाळयासाठी कर्जाच्यादृष्टीने मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र दिले जात होते. परंतु आजच्या स्थितीला ही पद्धती बंद झालेली आहे. हयाबाबत श्री. चन्ने साहेबांचा जेव्हा निरोप समारंभाचा कार्यक्रम होता त्यावेळी हयाबाबतची कल्पना श्री. चन्ने साहेब यांनी श्री. गवादे, सहमुख्य अधिकारी/दु.व पु. यांना दिलेली होती. त्यामुळे कर्जाच्यादृष्टीने पूर्वीप्रमाणेच ना हरकत प्रमाणपत्र देण्यास हरकत नसावी असे वाटते. मा. सभापती यांनी तदनुषंगाने उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना असे आदेश दिले की, हयाबाबतची सविस्तर माहिती गोळा करुन वस्तुस्थिती मंडळापुढे सादर करावी व अशाप्रकारे जर पूर्वी कर्जासाठी ना हरकत प्रमाणपत्रे दिली गेली असतील तर आपण तसा ठराव मंडळामध्ये संमत करुन घेऊ. मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी तदनुषंगाने असे प्रतिपादन केले की, मंडळामार्फत कर्जासाठी जे ना हरकत प्रमाणपत्र दिले जात होते त्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार संबंधितांना कर्ज उपलब्ध होत होते.

मा. सभापती हयांनी बैठकीच्या शेवटी सन्मा. सदस्य ,अधिकारी/कर्मचारीवर्गाचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

मुख्य अधिकारी,मुं.इ.दु.व पु.मंडळ

सचिव तथा
निवासी कार्यकारी
अभियंता / इवपु.

मा. सभापती /मुं.इ.दु.व पु.मंडळ